* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :– ०१/०५/१९

***मा. पोलीस अधिक्षक वाशिम जिल्हा श्री वसंत परदेशी यांच्या हस्ते वाशिम जिल्हयात ई चलान प्रणाली कार्यान्वीत.***

वाशिम जिल्हा पोलीस दलात मोटार वाहन कायदयाची अंमलबजावणी करताना कारवाईमध्ये सुसुत्रता यावी व वाहन चालकांवर डिजीटल चलनाद्वारे कारवाई करण्यासाठी मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) म. रा.मुंबई यांच्या ***"एक राज्य एक चलान "*** या संकल्पनेतुन आज दिनांक ०१/०५/२०१९ महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परेदशी, वाशिम जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली ***"ई चलान प्रणाली "*** चे उदघाटन करण्यात आले, त्या प्रसंगी अपर पोलीस अधिक्षक वाशिम श्री विजयकुमार चव्हाण, पोलीस उप अधिक्षक गृह श्री धात्रक, वाहतुक शाखेचे अधिकारी पोलीस निरिक्षक राठोड, सहाय्यक पोलीस निरिक्षक विनायक जाधव तसेच वाहतुक शाखेचे कर्मचारी यांच्या समवेत ई चलान प्रणाली ची सुरवात करण्यात आली. सदर ई प्रणालीचे समन्वय अधिकारी म्हणुन श्री. धात्रक, पोलीस उप अधिक्षक गृह हे करणार आहेत.

सदर यंत्रणा कॅमेरा रेकॉर्डीग पुराव्यासह परिपुर्ण असल्याने व यामध्ये किमान मानवी हस्तक्षेप असल्याने अधिक पारदर्शकता आहे. पुराव्यासह कारवाई होत असल्याने रस्त्यावर वाहन चालक व वाहतुक पोलीस यांच्यामध्ये होणाऱ्या वादाला आळा बसेल. सदर डिव्हाईस मध्ये डिजी लॉकर सुविधा असल्याने कोणत्याही वाहनाचे कागदपत्र वाहन चालक यांना मागणी करण्याची आवश्यकता नाही. सदरची प्रणाली ही परिवहन विभागाच्या Sarthi.com वेबसाईटला लिंक केली असल्याने वाहनाचा प्रकार, रंग,नोंदणी क्रमांक, डिव्हाईस मध्ये नोंद करताच सदर वाहन कोणाच्या मालकीचे आहे, चालकाने वाहनाचा सांगितलेला क्रमांक बरोबर आहे किंवा कसे याबाबत तात्काळ माहिती मिळणार आहे.

बेशिस्त वाहन चालक यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर कोणत्या कलमान्वये दंड केलेला आहे, त्यास किती रुपये दंड आहे त्याबाबत वाहन चालकास मजकुर संदेश (Text Message) ने मिळणार असल्याने कोणत्याही प्रकारची फसवणुक होणार नाही. तसेच वाहन चालक यांना त्वरीत जागेवर डेबीट कार्ड,क्रेडीट कार्ड स्वाईप करुन दंड भरण्याची सुविधा या डिव्हाईस मध्ये आहे. यामुळे वाहन चालकास करण्यात आलेल्या चलनाचे परिपुर्ण रेकॉर्ड जतन करण्यात येणार आहेत.

सदरच्या डिजिटल कारवाईची अमंलबजावणी वाढल्याने वाशिम जिल्हयातील बेशिस्त वाहन चालकांमध्ये शिस्त वाढीस लागुन अपघाताना आळा बसेल. तसेच वाशिम जिल्हा वाहतुक पोलीसांच्या कारभारात पारदर्शकता आल्याने व वाहतुक पोलीसांची प्रतिमा चांगली होण्यास नक्की मदत होईल.

Sthakare 1/05/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम